संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
09 SEP 2026
प्राप्त झाले सही........................

एकतर्फी कार्यमुक्त करणेबाबत.
श्रीम. राजश्री ठोकळ, सहसंचालक.

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग,
शासन आदेश, क्रमांक:-संलेको-२०२६/प्र.क्र.१६३/कोषा.प्रशा- २
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :-०९ सप्टेंबर, २०२६.

**संदर्भ** :- वित्त विभाग, शासन आदेश क्र. संलेको-२०२६/प्र.क्र.५९/कोषा.प्रशा-२, दि. २९.०५.२०२६.

## शासन आदेश

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहसंचालक संवर्गातील अधिकाऱ्यांच्या संदर्भाधीन आदेशान्वये प्रशासकीय बदल्या करण्यात आल्या आहेत. सदर आदेशाच्या विवरणपत्रातील अनु.क्र.७ येथील श्रीम. राजश्री राजाराम ठोकळ, उपमुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई यांची उप सचिव तथा नियंत्रक अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई या पदावर बदली करण्यात आली आहे. तथापि, सदर पदावर हजर होण्याकरीता श्रीम. ठोकळ यांना त्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनी अद्याप कार्यमुक्त केलेले नाही. यास्तव, संदर्भाधिन शासन आदेशाचे अनुपालन होण्याकरीता श्रीम. राजश्री राजाराम ठोकळ, उपमुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई यांना सध्याच्या पदावरुन दिनांक ०९.०९.२०२६ (म.नं.) पासून शासन स्तरावरून एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे.

२. संदर्भाधिन बदली आदेशानुसार श्रीम. ठोकळ यांनी बदलीच्या पदावर तात्काळ हजर व्हावे. त्यासंबंधीचा रूजू अहवाल संचालनालय व शासनास सादर करावा. हे आदेश तात्काळ प्रभावाने अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रुपाली सं. कबरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति -

१. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई,*
३. महालेखापाल- /२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई नागपूर,*
४. संबंधित अधिकाऱ्यांच्या सध्याच्या कार्यालयाचे प्रमुख*,
५. संबंधित अधिकाऱ्यांची बदली झालेल्या कार्यालयाचे प्रमुख*,
६. श्रीम. राजश्री राजाराम ठोकळ, सहसंचालक*,
७. निवडनस्ती/कोषा.प्रशा-२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(*संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)